जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 4 AUG 2026
लोकसत्ता

# भारत-चीन धोरणात आर्थिक, लष्करी क्षमतेचा विचार आवश्यक

## डॉ. अशोक चौसाळकर यांचे मत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** चीनसोबत पूर्णतः मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे भविष्यातही अवघड असले तरी संवादाचे मार्ग खुले ठेवणे आवश्यक आहे. भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक संबंध मोठे आहेत. त्यामुळे एकीकडे चीनवरील आर्थिक अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दुसरीकडे राष्ट्रीय सुरक्षा, तंत्रज्ञान आणि सामरिक हितसंबंध यांना सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि निवृत्त सैनिका लीग यांच्या संयुक्त विद्यमाने लेफ्टनंट जनरल एस. पी. पी. थोरात यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रीराम पवार म्हणाले, भारत-चीन दोघांनाही जागतिक राजकारणात प्रभावी भूमिका बजावायची असल्याने दोन्ही देशांतील स्पर्धा आणि तणाव दीर्घकाळ कायम राहण्याची शक्यता आहे. आजच्या परिस्थितीत चीनसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि आर्थिक सहकार्य आवश्यक असले तरी भारताने 'मैत्री ठेवा, पण सतत सावध राहा' ही भूमिका स्वीकारणे गरजेचे आहे.



राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर.

बाळ पाटणकर यांनी लेफ्टनंट जनरल एस.पी. पी. थोरात यांनी महाराष्ट्राला एनडीए अकादमी तसेच कोल्हापूरला गोल्फ कोर्स, नवीन राजवाड्यातील संग्रहालय निर्माण करण्यात अमूल्य योगदान दिल्याचे सांगितले. डॉ. प्रल्हाद माने यांनी डॉ. यशवंतराव थोरात यांच्या संदेशाचे वाचन, कर्नल सी.जे. रानडे यांनी प्रास्ताविक, डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय, मोसीम पठाण यांनी सूत्रसंचालन, दत्तात्रय सावंत यांनी आभार मानले. डॉ. प्रकाश पवार, कर्नल विक्रम नलावडे, नायब सुभेदार टी. एम. सूर्यवंशी, सुभेदार एन. एम. पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. अवनीश पाटील, सुरेश शिपूरकर, दिलीप पवार, डॉ. सुरेश शिखरे, शिक्षक, आजी-माजी सैनिक, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार

# भारत-चीन संबंधांमध्ये आर्थिक हितसंबंधांसोबत सुरक्षाविषयक सावधगिरी आवश्यक : डॉ. अशोक चौसाळकर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

भारत आणि चीन हे आशियातील दोन प्राचीन संस्कृती असलेले आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे देश आहेत. मात्र, सीमावाद, चीन-पाकिस्तानची वाढती जवळीक, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील चीनचे वर्चस्व आणि भारत-अमेरिका संबंध यांमुळे दोन्ही देशांमधील संबंध गुंतागुंतीचे झाले आहेत. त्यामुळे चीनसोबत आर्थिक संबंध वाढवत असतानाच भारताने सुरक्षेच्या दृष्टीने सातत्याने सावध राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.




शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि एक्स सर्व्हिसेस लीग यांच्या संयुक्त विद्यमाने लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार-संपादक डॉ. श्रीराम पवार अध्यक्षस्थानी होते. बाळ पाटणकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. चौसाळकर यांनी भारत-चीन संबंधांचा ऐतिहासिक आढावा घेताना या संबंधांचे चार प्रमुख टप्पे स्पष्ट केले. १९४९ ते १९६२ या काळातील 'हिंदी-चीनी भाई भाई'पासून १९६२च्या युद्धापर्यंतच्या घडामोडी, त्यानंतरचा दीर्घकाळातील तणाव, १९९०च्या दशकानंतर दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेली तुलनेने अनुकूल परिस्थिती आणि त्यानंतर चीनच्या बदललेल्या आक्रमक धोरणापर्यंतच्या प्रवासाचे त्यांनी विश्लेषण केले. ते म्हणाले, १९६२च्या युद्धाच्या संदर्भात भारताकडे लष्करी सामर्थ्याची कमतरता होती, हा समज पूर्णपणे योग्य नाही. त्या वेळी भारताकडे मोठ्या प्रमाणात सैन्य, रणगाडे आणि सक्षम हवाई साधने होती; मात्र नेतृत्वातील मतभेद आणि निर्णयक्षमतेच्या अभावामुळे उपलब्ध सामर्थ्याचा प्रभावी वापर होऊ शकला नाही, असे त्यांनी नमूद केले. या युद्धानंतर चीनने अक्साई चीनचा मोठा भूभाग आपल्या ताब्यात ठेवला असल्याचेही त्यांनी सांगितले.

चीनच्या बदलत्या आर्थिक आणि सामरिक सामर्थ्याकडे लक्ष वेधताना डॉ. चौसाळकर म्हणाले, आर्थिक सुधारणांनंतर चीनने विज्ञान-तंत्रज्ञान, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच लष्करी आधुनिकीकरणामध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे आजचा चीन हा केवळ आर्थिक महासत्ता नसून तंत्रज्ञान आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनेही प्रभावशाली शक्ती बनला आहे.

## गलवाननंतर अविश्वासाचे वातावरण

भारत-चीन संबंधांतील सध्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करताना डॉ. चौसाळकर यांनी, २०२०च्या गलवान संघर्षाचा विशेष उल्लेख केला. या घटनेनंतर दोन्ही देशांनी सीमाभागात मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले असून परस्परांमधील विश्वासाचे संकट कायम असल्याचे त्यांनी सांगितले. चीनचे धोरण अनेकदा अनपेक्षित स्वरूपाचे राहिले आहे. त्यामुळे भारताने चीनच्या धोरणाचा अभ्यास करताना त्याच्या आर्थिक, तांत्रिक आणि लष्करी क्षमतेचा एकत्रित विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत-चीन संघर्षातील प्रमुख मुद्द्यांवर भाष्य करताना चौसाळकर यांनी लडाखमधील सीमावाद आणि अरुणाचल प्रदेशावरील चीनचा दावा हे दोन महत्त्वाचे प्रश्न असून मॅकमोहन रेषा, अक्साई चीन आणि तवांग या संदर्भातील चीनची भूमिका दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सातत्याने तणाव निर्माण करणारी ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

## चीन-पाकिस्तान संबंध भारतासाठी महत्त्वाचा सुरक्षाविषयक घटक

चीन-पाकिस्तान संबंध हे भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे आव्हान असल्याचे सांगून डॉ. चौसाळकर म्हणाले, पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्यामध्ये चीनची भूमिका मोठी असून चीन-पाकिस्तान आर्थिक आणि सामरिक सहकार्याचा भारताच्या सुरक्षेवर परिणाम होतो. त्याचबरोबर बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हमधील पाकिस्तानमार्गे जाणारा प्रकल्प आणि त्यातील भारताच्या सार्वभौमत्वाशी संबंधित प्रश्नही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारताने क्वाडसारख्या बहुपक्षीय व्यासपीठांमध्ये सहभाग घेतल्याने चीनच्या दृष्टीने भारताची सामरिक भूमिका अधिक महत्त्वाची ठरली आहे. दुसरीकडे, ब्रिक्स आणि शांघाय सहकार्य संघटनेसारख्या व्यासपीठांवर भारत आणि चीन एकत्र कार्य करीत आहेत. त्यामुळे भारत-चीन संबंध हे केवळ संघर्षाचे नसून स्पर्धा, सहकार्य आणि परस्पर आर्थिक हितसंबंध यांचे मिश्रण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## 'दबाव ठेवत संवादही आवश्यक'

चीनसोबत पूर्णतः मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे भविष्यातही अवघड असले तरी संवादाचे मार्ग खुले ठेवणे आवश्यक आहे. भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक संबंध मोठे आहेत. त्यामुळे एकीकडे चीनवरील आर्थिक अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दुसरीकडे राष्ट्रीय सुरक्षा, तंत्रज्ञान आणि सामरिक हितसंबंध यांना सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे डॉ. चौसाळकर यांनी स्पष्ट केले.

## 'मैत्री ठेवा, पण सावध राहा'

अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रीराम पवार म्हणाले, भारत आणि चीन हे आशियातील दोन मोठे देश असून, दोघांनाही जागतिक राजकारणात प्रभावी भूमिका बजावायची आहे. त्यामुळे दोन्ही देशांतील स्पर्धा आणि तणाव दीर्घकाळ कायम राहण्याची शक्यता आहे. १९६२च्या युद्धाच्या अनुभवातून भारताने चीनच्या सामरिक उद्दिष्टांचा आणि भू-राजकीय, भू-आर्थिक हालचालींचा गांभीर्याने अभ्यास करण्याची गरज स्पष्ट होते. जनरल थोरात यांनी त्यावेळी केलेल्या लष्करी अभ्यासातून चीनच्या संभाव्य हालचालींचा अचूक अंदाज घेण्याची आणि युद्धाच्या परिस्थितीत प्रभावी प्रतिकाराची आवश्यकता अधोरेखित केली होती. आजच्या परिस्थितीत चीनसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि आर्थिक सहकार्य आवश्यक असले, तरी त्याचवेळी भारताने 'मैत्री ठेवा, पण सतत सावध राहा' ही भूमिका स्वीकारणे गरजेचे आहे. फार्मास्युटिकल्सपासून उद्योग आणि तंत्रज्ञानापर्यंत अनेक क्षेत्रांत चीनशी असलेले आर्थिक संबंध लक्षात घेता चीनला पूर्णपणे दूर ठेवणे व्यवहार्य नाही; मात्र राष्ट्रीय सुरक्षा, सामरिक स्वायत्तता आणि दीर्घकालीन राष्ट्रीय हित यांचा विचार करून प्रत्येक पाऊल अत्यंत सावधपणे टाकावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

कार्यक्रमात बाळ पाटणकर यांनी लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात यांच्या सान्निध्यातील आपल्या आठवणींना उजाळा दिला. जनरल थोरात यांनी आपल्याला पितृतुल्य प्रेम आणि मार्गदर्शन केले. ते अत्यंत मितभाषी, तत्त्वनिष्ठ, काटेकोर आणि आदर्श व्यक्तीमत्त्वाचे होते. महाराष्ट्राला एनडीए अकादमी तसेच कोल्हापूरला गोल्फ कोर्स आणि नवीन राजवाड्यातील संग्रहालय निर्माण करण्यात त्यांनी अमूल्य योगदान दिले, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. प्रल्हाद माने यांनी डॉ. यशवंतराव थोरात यांच्या संदेशाचे वाचन केले. कर्नल सी.जे. रानडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. मोसीम पठाण यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय सावंत यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रकाश पवार, कर्नल विक्रम नलावडे, नायब सुभेदार टी.एम. सूर्यवंशी, सुभेदार एन.एम. पाटील, डॉ. अरूण भोसले, डॉ. अवनीश पाटील, सुरेश शिपूरकर, डॉ. सुरेश शिखरे यांच्यासह शिक्षक, अनेक आजी-माजी सैनिक, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 AUG 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांचे 'जेन-झी'ला आवाहन; विद्यापीठात राज्यस्तरीय चर्चासत्र

# शोषणमुक्त समाजाचे स्वप्न साकारावे

**स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या दृष्टिकोनातून प्रतिसरकार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचे आंदोलन नव्हते, तर स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्थेविरोधी, जमीनदारशाहीचा अंत आणि सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त समाज निर्मितीचे सुंदर स्वप्न होते. हे स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नाही. ते साकार करण्याची जबाबदारी आता 'जेन–झी'ने स्वीकारावी, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.**




**कोल्हापूर : मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर. यावेळी आमदार अरूण लाड, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. भारती पाटील उपस्थित होते.**

**त.भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे श्रीमती कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. 'प्रतिसरकारची चळवळ: रणरागिणी रणी ठाकल्या" या विषयावरील त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. आमदार अरूण लाड, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थित होती.

डॉ. पाटणकर म्हणाले, ब्रिटिशांच्या सत्ताकाळातच स्वातंत्र्यानंतरचा समाज उभा करण्याचा प्रयत्न प्रतिसरकारच्या माध्यमातून झाला. जमीनदारांच्या दडपशाहीविरोधातील संघर्ष आणि पिढ्यानूपिढ्या कसणाऱ्या कुळांना जमिनीचा हक्क मिळावा, यांसाठी प्रतिसरकारने भूमिका घेतली. न्यायदान मंडळे, सेवा दल, ग्रामस्वच्छता, वाचनालये, सहभोजन, 'एक गाव एक पाणवठा' यांसारख्या उपक्रमांतून सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी करण्यात आली. जातीय विषमता, अस्पृश्यता, सावकारशाही आणि स्त्रियांवरील अन्यायाविरोधात प्रतिसरकारने संघर्ष केला. त्यागातून निर्माण झालेले स्वातंत्र्य केवळ सत्तांतरापुरते मर्यादित न राहता सामाजिक आणि आर्थिक समतेत रूपांतरित व्हावे, ही त्यामागची भूमिका होती. मात्र प्रतिसरकारचे स्वप्न अद्याप साकार झालेले नाही. त्यामुळे आजच्या युवा पिढीने पुढाकार घेण्याची आवश्यकता डॉ. पाटणकर यांनी व्यक्त केली.

डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. दशरथ पारेकर, डॉ. कपिल राजहंस, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती यांच्यासह संशोधक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, प्रतिसरकारने न्यायदान समित्यांच्या माध्यमातून ग्रामराज्याचा प्रयोग केला. शेतकऱ्यांना न्याय देण्यासोबतच दारूबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधी पद्धतीने विवाह आणि अस्पृश्यता निवारण यांसारखे विधायक उपक्रम राबवून सामाजिक स्वराज्याची पायाभरणी केली. प्रतिसरकार चळवळ आणि तिच्यातील स्त्रीशक्तीचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्याचाही विचार करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### 'आपल्याच सरकारने बापूंना का पकडले?'

**आमदार अरूण लाड म्हणाले, स्वातंत्र्याचे खरे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, नागरिकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी जी. डी. बापू लाड अखेरपर्यंत संघर्षशील राहिले. विधिमंडळ सदस्यानंतर मिळणारे निवृत्तीवेतन समाजकार्यासाठी वापरले. जी. डी. बापूंना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्याच सरकारने का पकडले वा तुरुंगात का टाकले, यावरही संशोधकांनी प्रकाश टाकायला हवा, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.**

14 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारचे शोषणमुक्त समाजाचे स्वप्न 'जेन-झी'ने साकारावे

## डॉ. भारत पाटणकर यांचे आवाहन

**॥ कोल्हापूर : स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या दृष्टिकोनातून प्रतिसरकार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचे आंदोलन नव्हते, तर स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्थेविरोधात, जमीनदारशाहीचा अंत आणि सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त समाजनिर्मितीचे सुंदर स्वप्न होते. हे स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नाही. ते साकार करण्याची जबाबदारी आता 'जेन-झी'ने स्वीकारावी, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.**



शिवाजी विद्यापीठाचे श्रीमती कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणी ठाकल्या' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात बीजभाषक म्हणून डॉ. पाटणकर मानव्यशास्त्र सभागृहात बोलत होते.

डॉ. पाटणकर म्हणाले, प्रतिसरकारची संकल्पना इंग्रजांना हाकलून देण्यापुरती मर्यादित नव्हती. ब्रिटिश काळातच स्वातंत्र्यानंतरचा समाज उभा करण्याचा प्रयत्न त्यातून झाला.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, या चळवळीच्या इतिहासात भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय देणे, संदेश पोहोचवणे, शस्त्रे लपवणे आणि प्रसंगी स्वतः शस्त्र हाती घेणाऱ्या लीलाताई पाटील, इंदुताई पाटणकर, राजमती पाटील यांच्यासह असंख्य रणरागिणींच्या योगदानाला अपेक्षित न्याय मिळालेला नाही. प्रतिसरकार चळवळ आणि तिच्यातील स्त्रीशक्तीचा इतिहास पोहोचवण्यासाठी दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्याचाही विचार करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आमदार अरुण लाड म्हणाले, जी.डी. बापू लाड यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातही स्वातंत्र्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघर्ष केला. विधिमंडळ सदस्य म्हणून मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम समाजकार्यासाठीच वापरणारे, ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणाऱ्या जी. डी. बापूंना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्याच सरकारने तुरुंगात का टाकले, यावरही संशोधकांनी प्रकाश टाकायला हवा.

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. दशरथ पारेकर, डॉ. कपिल राजहंस, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती आदी उपस्थित होते.

### प्रतिसरकारमधील कर्तृत्ववान स्त्रियांचा गौरव

प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान स्त्रियांच्या सहभागाविषयीच्या चर्चासत्रात डॉ. पद्मजा पाटील, डॉ. कल्पना गुरव, प्रसाद कुलकर्णी, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. प्रकाश कुंभार, दमयंती पाटील, डॉ. दशरथ पारेकर, संपत मोरे, डॉ. दिनकर पाटील, विष्णू पावले, डॉ. अवनीश पाटील यांनी सहभाग घेतला. डॉ. भारती पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप झाला.

14 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारचे शोषणमुक्त समाजाचे स्वप्न 'जेन-झी'ने साकारावे : डॉ. पाटणकर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित चर्चासत्रात बीजभाषण करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर. सोबत आमदार अरुण लाड, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. भारती पाटील.

**जनप्रवास : कोल्हापूर**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या दृष्टिकोनातून प्रतिसरकार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचे आंदोलन नव्हते, तर स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्थेविरोध, जमीनदारशाहीचा अंत आणि सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त समाजनिर्मितीचे सुंदर स्वप्न होते. हे स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नाही; ते साकार करण्याची जबाबदारी आता 'जेन-झी'ने स्वीकारावी, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रतिसरकारची चळवळः रणरागिणी रणी ठाकल्यां' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते, तर, आमदार अरूण लाड, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. पाटणकर म्हणाले, प्रतिसरकारची संकल्पना केवळ इंग्रजांना हाकलून देण्यापुरती मर्यादित नव्हती. ब्रिटिशांच्या सत्ताकाळातच स्वातंत्र्यानंतरचा समाज उभा करण्याचा प्रयत्न त्यातून झाला. जातीय विषमता, अस्पृश्यता, सावकारशाही आणि स्त्रियांवरील अन्यायाविरोधात प्रतिसरकारने संघर्ष केला. हा लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हता, तर शोषित समाजाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी होता, असे डॉ. पाटणकर यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, सातारा-सांगली परिसरात जनमत संघटित करून अन्याय-अत्याचाराविरोधात लढताना प्रतिसरकारने न्यायदान समित्यांच्या माध्यमातून ग्रामराज्याचा प्रयोग केला; दारूबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधी पद्धतीने विवाह आणि अस्पृश्यता निवारण यांसारखे विधायक उपक्रम राबवून सामाजिक स्वराज्याची पायाभरणी केली.

डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. दशरथ पारेकर, डॉ. कपिल राजहंस, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती यांच्यासह संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2026
सकाळ

# शोषणमुक्त समाज निर्मितीची जबाबदारी जेन-झीने स्वीकारावी

## डॉ. भारत पाटणकर : विद्यापीठात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १३ : शोषणमुक्त समाज निर्मितीचे सुंदर स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी जेन-झीने स्वीकारावी, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणि ठाकल्या' विषयावरील चर्चासत्रात बोलताना डॉ. भारत पाटणकर.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व क्रांतीअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासनातर्फे झालेल्या 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणि ठाकल्या' विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद् घाटन प्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. आर. के. कामत अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात चर्चासत्र झाले.

डॉ. पाटणकर म्हणाले, 'प्रतिसरकारची संकल्पना केवळ इंग्रजांना हाकलून देण्यापुरती मर्यादित नव्हती. ब्रिटिशांच्या सत्ताकाळातच स्वातंत्र्यानंतरचा समाज उभा करण्याचा प्रयत्न त्यातून झाला. समांतर सत्तेची निर्मिती करण्याचा तो प्रयत्न होता. स्त्रियांच्या मुक्तीचा कार्यक्रम, जमीनदारांच्या दडपशाहीविरोधातील संघर्ष व पिढ्यान् पिढ्या कसणाऱ्या कुळांना जमिनीचा हक्क मिळावा, यासाठी प्रतिसरकारने भूमिका घेतली.'

डॉ. कामत म्हणाले, 'भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय देणे, संदेश पोहोचविणे, शस्त्रे लपविणे व प्रसंगी स्वतः शस्त्र हाती घेणाऱ्या लीलाताई पाटील, इंदूताई पाटणकर, राजमती पाटील यांच्यासह असंख्य रणरागिणींच्या योगदानाला अपेक्षित न्याय मिळालेला नाही.' आमदार अरुण लाड यांनी जी. डी. (बापू) लाड यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. दशरथ पारेकर, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. कपिल राजहंस उपस्थित होते. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी

जनसंपर्क कक्ष
१ 4 AUG 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथपाल, क्रीडा संचालकांची भूमिका 'एनईपी' अंमलबजावणीत महत्त्वाची

## शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय कार्यशाळेत मत व्यक्त

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी २०२०) प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण संस्थांमधील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांनी बदलत्या व्यवस्थेनुसार कार्यपद्धती विकसित करणे आवश्यक आहे. नव्या शैक्षणिक धोरणामुळे निर्माण झालेल्या संधींचा लाभ घेत संस्थांनी नव्या भूमिका स्वीकाराव्यात,' असे मत शिवाजी विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत व्यक्त करण्यात आले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची भूमिका व आव्हाने' या विषयावर झालेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. प्रदीप खेडकर, प्रा. शरद बनसोडे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग, महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघ आणि अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची भूमिका व आव्हाने' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर, क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. यावेळी प्रा. डॉ. रवींद्र भताने, प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, माजी आमदार भगवानराव साळुंखे उपस्थित होते.

राज्य समितीचे सदस्य डॉ. अनिल राव यांचे बीजभाषण झाले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल, त्यातील संधी आणि संस्थांनी स्वीकारावयाच्या नव्या कार्यपद्धती याबाबत मार्गदर्शन केले. विविध सत्रांमध्ये ग्रंथपालांची भूमिका व आव्हाने, उच्च शिक्षण क्षेत्रात होणारे बदल तसेच शारीरिक शिक्षण संचालकांची भूमिका, आव्हाने व त्यावरील उपाय या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचा आढावा घेण्यात आला. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. जी. पवार, डॉ. चेतना सोनकांबळे, प्रा. महेश केसरकर, डॉ. शार्दुल सेलुकर, डॉ. राहुल माने, डॉ. कृष्णा पवार यांनी कार्यशाळेचे नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2026
सकाळ

# दुर्मीळ लष्करी छायाचित्र प्रदर्शनास विद्यापीठात प्रारंभ

कोल्हापूर, ता. १३ : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराचा गौरवशाली इतिहास, जवानांचे शौर्य, त्याग, प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवाजी विद्यापीठात दुर्मीळ लष्करी छायाचित्रांच्या दोन दिवसीय प्रदर्शनास आज सुरुवात झाली.

विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि पुणे येथील ऑलिव्ह ग्रीन व्हेंचर फाउंडेशन यांच्या वतीने भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात भरवलेल्या प्रदर्शनात १९४७, १९६२, १९६५, १९७१ तसेच कारगिल युद्धातील ३५० दुर्मीळ छायाचित्रे आहेत. लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे, नितीन शास्त्री आणि जे. आर. भट यांनी छायाचित्रांमागील युद्धातील घडामोडींची माहिती दिली. प्रदर्शन उद्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुले राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर
1 4 AUG 2026
तरुण भारत

# निशा दोरूगडे विद्यापीठात द्वितीय

**आजरा :** शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या बी.एस्सी. पदवी परीक्षेत आजरा महाविद्यालयाची विद्यार्थिनी निशा दोरुगडे हिने शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकाविला. तिने संख्याशास्त्र विषयातून बी.एस्सी. पदवी पूर्ण केली.



निशा दोरूगडे

शिवाजी विद्यापीठामार्फत एप्रिल २०२६ मध्ये बी.एस्सी. पदवी परीक्षा घेण्यात आली. निशा दोरुगडे हिला जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी यांच्यासह संचालक मंडळाचे प्रोत्साहन व प्रभारी प्राचार्य डॉ. किरण पोतदार, प्रा. श्रुती ओतारी, प्रा. वर्षा पाटील, डॉ. बाबासाहेब मोहिते, डॉ. एल. डी शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशास 10 सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि. १० सप्टेंबर २०२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.पी.एस.पाटणकर यांनी दिली.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रा अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण (Distance Mode) अभ्यासक्रमांसह एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या ऑनलाईन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत.

विविध कारणांमुळे नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, शिक्षण अर्धवट राहिलेले विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थी यांच्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यासक्रम एक उत्तम संधी उपलब्ध करून देतात. केंद्राच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या https://www.unishivaji.ac.in अधिकृत संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/login जाऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयाशी किंवा जवळच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दुहेरी पदवी (Dual Degree) घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ.पाटणकर यांच्या कडून करण्यात आलेले आहे.